**नियमित दिवाणी दावा क्र.१२१/२०१७**

दत्तात्रय विरुध्द विश्वनाथ व इतर

सीएनआरक्र.एमएचएएच२२०००७६७२०१७

**आदेश निशाणी क्र.१८ खालील**

(पारित दिनांक ०५.१२.२०२०)

वादीने प्रस्तुत दावा वाटप व विभक्त ताबा मिळणेसाठी दाखल केला असून दावा न्यायप्रविष्ट असतांना प्रतिवादी क्र.२ याने दावा मिळकती पैकी काही क्षेत्र अलका दत्तु नेटके हिला विक्री केले असून त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

२) वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती वडिलोपार्जित असून त्यांचा अविभक्त हिस्सा आहे. तथापि, प्रतिवादी क्र.२ ने यापूर्वी ही गजानन शिंदे, नागेश फुगे यांना जमिनी विक्री केल्या असून सदर विक्री कुटुंबास कायदेशीर गरज नसतांना केली आहे. प्रस्तुत दावा न्यायप्रविष्ट असतांना प्रतिवादी क्र.२ ने हजर होवून दाव्यास कैफियत दिल्यानंतर दिनांक ०४.०७.२०१९ रोजी अलका दत्तु नेटके हिला गट क्र.९/१ पैकी ४० आर क्षेत्र विक्री केले असून त्या अनुषंगाने दाव्यात खरेदीदारास पक्षकार करणे व सदर खरेदीपत्र बेकायदेशीर असून रद्द बातल असल्याबाबतची मागणी करण्याबाबत आकारणी व विनंती कलमात दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

३) प्रस्तावित प्रतिवादीने हजर होवून निशाणी क्र.१३ वर अर्जास म्हणणे दिले असून तिने अर्जातील मजकूर नाकारला आहे. तिच्या कथनाप्रमाणे वादी, प्रतिवादीत वाटप झाले असून तिला मिळकत दिशा दाखवून विक्री केली आहे. प्रतिवादी क्र.२ चा अपघात झाल्यामुळे त्यास औषधोपचारासाठी व प्रतिवादी क्र.४ चे शिक्षणाचे खर्चासाठी पैशांची आवश्यकता होती. त्यामुळे त्याने मिळकत विक्रीस काढली. ती मिळकत तिने २,६०,०००/- रुपयास खरेदी घेतली असून तिने जमिनीची सुधारणा केली आहे. तिची मालकी हक्काने ताबे वहिवाट असून सदर

जमिनीत वादींचा कोणताही हक्क हितसंबंध नाही. प्रस्तावित प्रतिवादी ही प्रमाणिक खरेदीदार असून तिच्या विरुध्द वादींना वाटपाची दाद मागता येणार नाही. सबब अर्ज नामंजूर करावा असे कथन केले आहे.

४) प्रतिवादी क्र.२ ने निशाणी क्र.२२ वर म्हणणे देवून अर्जातील मजकूर स्पष्टपणे नाकारला आहे. त्याच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतींचे वाटप झाले असून वादी, प्रतिवादींनी आपआपल्या नावावरील जमिनी दिशा दाखवून विक्री केल्या आहेत. त्याने त्याच्या वाटपास मिळालेली मिळकत विक्री केली असून वादी हा सुशिला संजय घोडावत कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सांगली येथे शिक्षण घेतले आहे. त्याचा संपूर्ण खर्च प्रतिवादी क्र.२ ने केला असून प्रतिवादी क्र.४ ने ही इंजिनियरिंग डिप्लोमा केला आहे, त्याचा ही खर्च प्रतिवादी क्र.२ ने केला आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ चा डावा पाय मोडल्याने त्यास औषधोपचारासाठी पैशांची आवश्यकता होती. त्यांनी दत्तु सिताराम नेटके याच्याकडून उसणवार रक्कम घेतली होती. ती रक्कम देण्यासाठी व वादी व इतर प्रतिवादीं त्यास सांभाळत नसल्याने उदरनिर्वाहासाठी त्याने जमीन विक्री केली असून अर्जात कोणताही तथ्यांश नाही.

५) यापूर्वी प्रतिवादी क्र.३ ने गट क्र.९/३ पैकी ६० आर जमीन प्रतिवादी क्र.१० यास विक्री केली असून प्रतिवादी क्र.१ ने ८३ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.११ हिला विक्री केले आहे. प्रतिवादी क्र.१० ने खरेदी घेतलेली जमीन प्रतिवादी क्र.११ यास विक्री केली आहे. प्रतिवादी क्र.४ ने गट क्र.९/२ पैकी ८० आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१२ यास विक्री केले असून सदर खरेदीपत्रे दिशा दाखवून केली आहेत. त्यामुळे गट क्र.९/१ ही जमीन एकत्र कुटुंबाची राहिली नाही. त्यामुळे वादीस दुरुस्ती अर्ज कायदयाने देता येणार नाही. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करावा.

६) वादींतर्फे विधीज्ञ श्री.के.एस. शेवाळे व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.बी.डी. टकले यांचा युक्तिवाद ऐकला.

७) प्रस्तुत अर्जाचे चौकशी कामी खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावर

कारणांसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय करण्यास उपयुक्त व आवश्यक आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

८) प्रस्तुत दावा वाटप व विभक्त ताब्यासाठी दाखल केला असून वादीने प्रतिवादी क्र.२ विरुध्द मिळकत विक्री करु नये म्हणून तुर्तातुर्त ताकिदीची मागणी केली होती. सदर अर्ज दिनांक १३.०२.२०२० रोजी मंजूर केला आहे. प्रस्तुत दावा दिनांक २१.०७.२०१७ रोजी दाखल केला असून प्रतिवादी क्र.२ ने हजर होवून निशाणी क्र.१७ वर दिनांक १७.०२.२०१८ रोजी कैफियत दिली आहे. प्रतिवादी क्र.२ यास दावा मिळकती संबंधी वाद न्यायालयात प्रलंबित आहे याची माहिती होती. असे असून ही दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.२ ने दाव्यात समाविष्ट असणाऱ्या गट क्र.९/२ पैकी ४० आर क्षेत्र प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ अलका दत्तु नेटके हिस विक्री केले आहे.

९) वादीने अर्जासोबत खरेदीपत्राची सत्यप्रत दाखल केली असून प्रतिवादी क्र.२ व प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ यांनी म्हणण्यात खरेदीपत्र केल्याची बाब स्पष्टपणे मान्य केली आहे. वास्तविक दावा मिळकती संबंधी वाद प्रलंबित असतांना दोन्ही पक्षकारांनी मिळकतीचे मालकी संबंधी आहे ती परिस्थिती ठेवणे आवश्यक असते. प्रतिवादी क्र.२ यास न्यायालयात वाद प्रलंबित आहे याची माहिती असतांना ही त्याने मिळकती विक्री केली आहे. प्रतिवादी जरी मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झाल्याचे कथन घेवून आला असला तरी त्याबाबत ठोस कागदोपत्री पुरावा सादर

केला नाही. ७/१२ पत्रकी वेगळया नोंदी आहेत म्हणून वाटप झाले असे गृहित धरता येणार नाही. तसेच दोन्ही पक्षकारांचा पुरावा आल्या शिवाय वाटप झाल्याचे कथन विचारात घेता येणार नाही. वादींनी अदयाप दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप झाले नसून सदर मिळकती वडिलोपार्जित असल्याने त्यांचा अविभक्त हिस्सा असल्याचे कथन केले आहे. अशा परिस्थितीत दावा न्यायप्रविष्ट असतांना झालेल्या व्यवहारासंबंधी वादींना याच दाव्यात दाद मागता येईल. त्या अनुषंगाने वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल केला असून खरेदीदारास आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याची परवानगी मागितली आहे.

१०) प्रतिवादींनी नमूद केलेली कारणे पाहता त्यांचा पुरावा आल्या शिवाय त्यावर विचार करता येणार नाही. मिळकत दाव्यात समाविष्ट असतांना झालेल्या व्यवहारासंबंधी वादी मागत असलेली दुरुस्ती प्रामाणिक वाटते. दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान अगर गैरसोय होणार नाही. अगर दाव्याच्या स्वरुपात प्रस्तावित दुरुस्तीने कोणताही बदल होणार नाही. याउलट वादी, प्रतिवादीतील वादाचे समूळ निराकरण करण्यास न्यायालयास मदत होणार आहे. दावा वाटपाचा असल्याने खरेदीदार आवश्यक पक्षकार आहेत. त्यास समाविष्ट केल्यास त्याचे नुकसान होणार नाही. त्यास कैफियत देवून बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे. सबब अर्ज मंजूर करणे न्याय वाटते. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ चे उत्तरा दाखल खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर केला.

२. वादींनी विनंती प्रमाणे १४ दिवसांत दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत पटलावर दाखल करावी.

Dhanaji Jayasing Patil
Digitally signed by Dhanaji Jayasing Patil
Date: 2020.12.05 16:26:29 +0530

दिनांक ०५.१२.२०२० ( डि.जे. पाटील )

कर्जत दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कर्जत.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Ganesh Sudhakar Mancharkar |
| Name of Court | : | Shri.D.J. Patil Saheb,<br>Judicial Magistrate First Class, Karjat, Tal.Karjat, Dist.Ahmednagar. |
| Order date | : | 05.12.2020 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 05.12.2020 |
| Order digitally signed by the Presiding Officer on | : | 05.12.2020 |
| Order uploaded on | : | 05.12.2020 |